महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने द्यावयाचे जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत मार्गदर्शक सूचना ...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक - बीसीसी-२०२४/प्र.क्र. ७५/आरक्षण-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक - ५ जुलै, २०२४

संदर्भ-

१.सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-३ , दि.११ मार्च २०२४.

२.सामान्य प्रशासन विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र.बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-३, दि.१५ मार्च २०२४.

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र.बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-५, दि. २८ जून २०२४.

४. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४

शासन परिपत्रक -

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ दिनांक २६.०२.२०२४ पासून राज्यात अंमलात आला असून याअन्वये राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील व पदांवरील सरळसेवांमधील नियुक्तीसाठी व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी १० टक्के आरक्षण विहित करण्यात आलेले आहे.

२. उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये संदर्भ क्र. १ येथील शासन परिपत्रकासोबतचे “परिशिष्ट-अ” रद्द करून “सुधारीत परिशिष्ट-अ” नुसार महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने द्यावयाचे जात प्रमाणपत्र व नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या होत्या.

३. तद्नंतर, शासनाने संदर्भ क्र.३ येथील दि. २८.०६.२०२४ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गाच्या उमेदवारांच्या सोयीसाठी जात प्रमाणपत्र (परिशिष्ट अ) व नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र (परिशिष्ट- ब) स्वतंत्र पद्धतीने देण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तथापि, संदर्भ क्र. २ अन्वये यापूर्वी निर्गमित परिशिष्ट अ मधील जात प्रमाणपत्र व नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र या सदराखाली निर्गमित केलेली प्रमाणपत्रे ही महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ अस्तित्वात आल्यानंतर निर्गमित झालेली असल्याने सदर सर्व प्रमाणपत्रे यापुढेही वैध राहतील.

४. सध्या राज्यात मोठया प्रमाणात होत असलेल्या नोकर भरती तसेच शैक्षणिक प्रवेश प्रक्रियां दरम्यान अशाप्रकारे जिल्हास्तरावर प्रमाणपत्र देण्यास अटकाव झाल्यास त्याचा विपरीत परिणाम होण्याची व न्यायालयीन प्रकरणे उद्भवण्याची शक्यता आहे. सदर बाब विचारात घेता यापुढे संबंधित सक्षम प्राधिकारी, सर्व विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी/सर्व निवासी उप जिल्हाधिकारी/सर्व तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांनी एसईबीसी प्रवर्गातील उमेदवार/ विद्यार्थी यांना संदर्भ क्र.३ सोबत जोडलेल्या परिशिष्ट “अ” व परिशिष्ट “ब” मधील नमुन्यात विहीत मुदतीत प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक कार्यवाही तातडीने करावी.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२४०७०८१५१९४६१७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KHALID BASHIR AHMED ARAB

Digitally signed by KHALID BASHIR AHMED ARAB
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=17b1bdae334a3efab8ffa330885658eb14b09969ecbab94b7f20dfd8f09f568b, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=07B8F5561DC2748763D4033D2E7A20C2FBDCE61F9601805A936FED7CA35E329D, cn=KHALID BASHIR AHMED ARAB
Date: 2024.07.08 15:31:12 +05'30'

(खालिद बी अरब)
सह सचिव, महारष्ट्र शासन

प्रत-

१) राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अ.मु.स./प्र.स./सचिव,मंत्रालय, मुंबई.
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
५) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
६) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य/संसद सदस्य
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
८) अपर मुख्य सचिव (सेवा),सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०)अपर मुख्य सचिव, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) प्रधान सचिव, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, जी.टी. हॉस्पिटल, मुंबई.
१६) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-
१७) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८) महालेखापाल, महाराष्ट्र-१. मुंबई.
१९) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,

२०) अधिदान व लेखा अधिकारी, मुबई
२१) मुख्य महानगर दंडाधिकारी,
२२) सर्व विभागीय आयुक्त.
२३) सर्व जिल्हाधिकारी,
२४) सर्व उप विभागीय दंडाधिकारी (महसूल) तथा उप विभागीय अधिकारी,
२५) सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार,
२६) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई
२७) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, मुंबई.
२८) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, खंडपीठ नागपूर.
२९) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, नागपूर,
३०) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
३१) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
३२) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३३) महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
३४) संचालक, विजाभज संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३५) संचालक, उच्च तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३६) संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३७) संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३८) सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे,
३९) सर्व मंत्रालयीन विभाग त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात,
४०) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग/सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण
४१) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
४२) सर्व जिल्हा परिषदाचे समाजकल्याण अधिकारी
४३) सर्व अध्यक्ष/सदस्य सचिव, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती
४४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
४५) निवड नस्ती, आरक्षण-५.